<u>परिपत्रक क्र.</u> ५७ **इ.१० वी सराव परीक्षा जानेवारी,२०१८ परीक्षा व प्रश्नपत्रिकांबाबत.**

# रयत शिक्षण संस्था, सातारा.

कर्मवीर समाधी परिसर,सातारा.

**माध्यमिक आस्थापना परीक्षा विभाग**

**परिपत्रक क्र. ५७ दिनांक: ३०/१२/२०१७**

**<u>योग्य त्या कार्यवाहीसाठी</u>**

सर्व शाखाप्रमुख,
माध्यमिक विद्यालये, रयत शिक्षण संस्था.

यांना ............

**विषय :- <u>इ.१० वी सराव परीक्षा जानेवारी, २०१८ प्रश्नपत्रिकांबाबत.</u>**

संस्थेमार्फत इ.१० वीची सराव परीक्षा सर्व माध्यमिक विद्यालयात ता. १८/१/२०१८ पासून घेतली जाणार आहे. सदर परीक्षेच्या वेळापत्रकाच्या दोन प्रती सोबत जोडल्या आहेत. त्यातील एक प्रत विद्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावावी आणि दुसरी प्रत शाखेच्या दप्तरी ठेवावी. सदरच्या वेळापत्रकाप्रमाणेच परीक्षा घेण्याची व्यवस्था करावी.

संस्थेच्या सर्व शाखांनी शाखेस लागणाऱ्या विषयवार व इयत्तावर प्रश्नपत्रिकांची मागणी आपापल्या विभागीय कार्यालयाकडे नोंदविलेली आहे. त्यानुसार विभागीय कार्यालयांनी आपापल्या विभागाचे एकत्रित प्रश्नपत्रिकां मागणीचे तक्ते आमचेकडे पाठविलेले आहेत. त्यानुसार सदर परीक्षेच्या प्रश्नपत्रिकां रयत प्रिंटींग प्रेस,सातारा/अहमदनगर येथे छापून घेऊन, त्या पाचही विभागीय कार्यालयाकडे दिनांक १५/१/२०१८ पर्यंत पोहोच केल्या जाणार आहेत. तरी आपण आपल्या विभागीय कार्यालयांशी दिनांक १५/१/२०१८ पर्यंत संपर्क साधून, त्यांच्याकडून आपल्या शाखेच्या प्रश्नपत्रिकां वेळेत घेऊन जाण्याची व्यवस्था करावी. तसेंच (आपल्या शाखेची मागणी असल्यास) इ. १० वी सेमी इंग्रजी माध्यमाच्या बीजगणित,भूमिती,विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयांच्या प्रश्नपत्रिकाही घेऊन जाण्याची व्यवस्था करावी.

**महत्वाचे :-** (१) सोबतच्या वेळापत्रकातील इंग्रजी, बीजगणित व भूमिती या तीन विषयांच्या (मराठी व सेमी.इंग्रजी या दोन्ही माध्यमाच्या) **A,B,C,D** कोडप्रमाणे आपल्या विद्यालयात सदरच्या परीक्षा घ्याव्यात. सदरच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वाटपाचे काम खाली दिलेल्या सूचनेनुसार करावे.

(२) वर नमूद केल्याप्रमाणे इंग्रजी, बीजगणित व भूमिती या तीन विषयांच्या (मराठी व सेमी.इंग्रजी या दोन्ही माध्यमाच्या) **A,B,C,D** कोडप्रमाणे असल्यामुळे एस. एस. सी. बोर्ड परीक्षेच्या धर्तीवर सराव परीक्षेची बैठक व्यवस्था व प्रश्नपत्रिकांचे वाटप करण्यात यावे.

**<u>महत्वाची सूचना :-</u>**

१) तसेच इ.१२ वी सराव परीक्षा ता. १८/१/२०१८ पासून घेतली जाणार असून, संबंधित शाखांच्या प्रश्नपत्रिकाही इ.१० वी सराव परीक्षेबरोबरच पाठवल्या जाणार आहेत. तेंव्हा आपण आपल्या शाखेच्या इ.१० वी व इ.१२ वी सराव परीक्षेच्या प्रश्नपत्रिका एकाच वेळी आपले विभागीय कार्यालयाकडून घेऊन जाण्याची व्यवस्था करावी.

२) इ.१० वी च्या आरोग्य व शा.शिक्षण विषयाची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा शाखा पातळीवर घेऊन बोर्डाच्या नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

तरी आपण वरील सर्व सूचनानुसार इ.१० वी व इ.१२ वी सराव परीक्षा योग्य प्रकारे पार पाडाव्यात. तसेच प्रश्नपत्रिका कमी आल्यास अगर काही अडचणी आल्यास त्याबाबत आपल्या विभागीय कार्यालयाशी संपर्क साधून पूर्तता करून घ्यावी.

सदरचे परिपत्रक **http://www.rayatshikshan.edu** या संस्था वेबसाईटवर माहितीसाठी व आपण आपल्या शाखेत करावयाच्या कार्यवाहीसाठी उपलब्ध आहे.

कळावे.

(श्री.विलास महाडीक)
**सहसचिव(माध्य.)**
**रयत शिक्षण संस्था, सातारा.**

सोबत :- परीक्षा वेळापत्रक २ प्रती

(१) सर्व इन्स्पेक्टर्स, रयत शिक्षण संस्था.
(२) श्री. व्यवस्थापक, रयत प्रिंटींग प्रेस, सातारा.
(३) श्री. व्यवस्थापक, रयत प्रिंटींग प्रेस, अहमदनगर.

# रयत शिक्षण संस्था, सातारा

## सराव परीक्षा, इयत्ता १० वी

## वेळापत्रक

सन २०१७-१८

| दिनांक | वार | विषय | वेळ | गुण |
|---|---|---|---|---|
| १८/१/२०१८ | गुरुवार | मराठी | ८-०० ते ११-०० | ८० |
| १९/१/२०१८ | शुक्र'वार | इंग्रजी | ८-०० ते ११-०० | ८० |
| २०/१/२०१८ | शनिवार | हिंदी/संस्कृत<br>हिंदी (संयुक्त) | ८-०० ते ११-००<br>८-०० ते १०-०० | ८०<br>४० |
| २२/१/२०१८ | सोमवार | विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग-१ | ८-०० ते १०-०० | ४० |
| २३/१/२०१८ | मंगळवार | बीजगणित | ८-०० ते १०-०० | ४० |
| २४-१-२०१८ | बुधवार | इतिहास + राज्यशात्र | ८-०० ते १०-०० | ४० |
| २५/१/२०१८ | गुरुवार | भूमिती | ८-०० ते १०-०० | ४० |
| २७/१/२०१८ | शनिवार | भूगोल + अर्थशास्त्र | ८-०० ते १०-०० | ४० |
| २९/१/२०१८ | सोमवार | विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग-२ | ८-०० ते १०-०० | ४० |
| ३०/१/२०१८ | मंगळवार | व्यक्तिमत्व विकास | ८-०० ते १०-३० | ५० |
| ३१/१/२०१८ | बुधवार | माहिती संप्रेषण तंत्रज्ञान ICT | ८-०० ते १०-०० | ४० |
| १/२/२०१८ | गुरुवार | संस्कृत (संयुक्त) | ८-०० ते १०-०० | ४० |

टीप :-
१) वरील परीक्षा कार्यक्रमामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करू नये.
२) भाषा विषयांच्या तोंडी परीक्षा नवीन बदलानुसार शासकीय नियमानुसार विहित नमुन्यात परीक्षेपूर्वी घ्याव्यात.
३) शा.शिक्षण विषयाची लेखी परीक्षा शाखा पातळीवर प्रश्नपत्रिका काढून घ्यावी.
४) कार्यानुभव विषयाची प्रश्नपत्रिका शाखा पातळीवर काढून परीक्षा घ्यावी.
५) प्रात्यक्षिक विषयांच्या परीक्षा शाखांनी त्यांच्या सोयीनुसार घ्याव्यात.
**६) इ.१० वीच्या विध्यार्थींच्या बरोबर इ.१२ वी विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यावी.**

(श्री.विलास महाडिक)
**सहसचिव(माध्य.),**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

सातारा
दिनांक :३०/१२/२०१७